N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
(Under Section 154 Cr.P.C.)
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** मुंबई रेल्वे **P.S.(ठाणे):** पालघर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0153 **Year (वर्ष):** 2022

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 29/11/2022 02:38

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** सोमवार
**Time Period (कालावधी):** पहर 6
**Date From (दिनांक पासून):** 28/11/2022
**Date To ( दिनांक पर्यंत):** 28/11/2022
**Time From (वेळेपासून):** 16:59 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 16:59 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 29/11/2022 **Time (वेळ):** 02:20 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 002
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 29/11/2022 02:38 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
उत्तर, 40 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** डहाणू रेल्वे स्टेशनवरील,प्लटफॉर्म नं 03 वरील एमके,गुप्ता यांच्या स्टॉलसमोर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): वैभव चद्रकांत शिंदे
(b) **Father's Name** (वडील चे नाव) : चद्रकांत शिंदे
(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1985
(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत
(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):
(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):
**Date of Issue** (दिल्याची तारीख):
**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):
(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | राईपाडा, डहाणू,ता डहाणू, जि पालघर,डहाणु ,पालघर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | राईपाडा, डहाणू,ता डहाणू, जि पालघर,डहाणु ,पालघर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):
(j) **Phone number** (फोन नं.):
**Mobile** (मोबाइल नं.): 91-9902899144

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | AKIL JAMAL PATHAN | | वडील का नाम : जमाल पठाण | 1. फॉरेस्ट कॉलनी ,डहाणु पुर्व, ताडहाणु,,डहाणु ,पालघर, महाराष्ट्र,भारत . |
| 2 | SAMADHAN SHESHRAO NARWADE | | वडील का नाम : शेषराव नरवाडे | 1. 003,लक्ष्मीनाथ अपार्टमेंट, कचेरीरोड,पालघर ,पालघर, पालघर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

| **S.No.** (अ.क्र.) | **Property Category** (मालमत्ता वर्ग) | **Property Type** (मालमत्ता प्रकार) | **Description** (वर्णन) | **Value(In Rs/-)** (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | रोख रक्कम | 10,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(**चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य **(**रू. मध्ये**)):**

10,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(**इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.**,**जर असल्यास**)):**

| **S.No.** (अ.क्र.) | **UIDB Number** (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents** (प्रथम खबर हकीकत **):**

मी श्री.वैभव चद्रकांत शिंदे, वय 37 वर्षे, धंदा. व्यवसाय, रा.राईपाडा, डहाणू, ता. डहाणू, जि.पालघर मो. 99028991441 असा असून समक्ष फिर्याद लिहुन देतो की,
मी वरील प्रमाणे असून सध्या माझ्याकडे कोणतीही नोकरी नसल्याने बेकार आहे. सुमारे पंधरा दिवसापुर्वी मी गुजरात राज्यातुन गुटखा खरेदी करून तो रेल्वेने महाराष्ट्रातील डहाणू रोड रेल्व स्थानक येथे उतरून स्थानकाच्या बाहेर जात असताना जीआरपी पोलीस श्री पठाण व श्री नरवाडे साहेब यांनी मला थांबवून माझी बॅग चेक केली असता त्यामध्ये महाराष्ट्रात बंदी असलेला गुटखा मिळाल्याने त्यांनी मला गुन्हा दाखल करण्याची धमकी देवून माझ्याकडून 4000/- रूपये घेतले तसेच माझ्याकडील गुटखा सुध्दा घेतला. त्यानंतर मला सांगितले की तुला जर गुटख्याचा धंदा करायचा असेल तर आम्हाला दर महीना 10,000/- रूपयाचा हफ्ता दयावा लागेल. तु जर हफ्ता दिला नाही तर तुझ्यावर गुन्हा दाखल करू असे सांगितले. परंतु मला जीआरपी पोलीस श्री. पठाण व श्री नरवाडे साहेब यांना लाचेची रक्कम देण्याची इच्छा नसल्याने मी दिनाक 28/11/2022 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पालघर कार्यालयात समक्ष हजर राहून जीआरपी पोलीस श्री पठाण व श्री नरवाडे साहेब यांच्या विरूध्द लेखी तक्रार दिली. मी दिलेल्या तक्रारीच्या अनुशंगाने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पालघर कार्यालयाचे पोलीस उप अधीक्षक श्री. नवनाथ जगताप यांनी लाचेच्या मागणीची पडताळणी करणेकामी लागलीच महाराष्ट्र राज्य विदयुत वितरण कंपणीं बोईसर कार्यालयाशी संपर्क साधून दोन पंच साक्षीदार मागितले तसेच पडताळणी पथकाची ओळख करून दिली. त्यानंतर आम्ही पालघर लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालयातुन निघून शासकीय वाहनाने महाराश्ट्र राज्य विदयुत वितरण कंपणीं बोईसर कार्यालयाचे समोर आले. त्यानंतर पंच साक्षीदार शासकीय वाहनात बसल्यानंतर पंचाची, माझी व पडताळणी पथकाशी ओळख करून देवून मी दिलेली लेखी तक्रार वाचण्यास दिली. त्यांनतर आम्ही सदर ठिकाणाहून पोलीस उप अधीक्षक श्री.जगताप यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे सर्वजण शासकीय वाहनाने डहाणू रोड रेल्वे स्टेशनच्या पुर्व बाजुस येवून तेथील रिकाम्या जागेत वाहन थांबविले.
त्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्री.जगताप यांनी मला तसेच दोन्ही पंचांना पडताळणीच्या अनुशंगाने योग्य त्या सुचना दिल्या. तसेच ब्युरोच्या कार्यपध्दतीप्रमाणे पडताळणी पुर्व आवश्यक ती सर्व कार्यवाही पुर्ण करून घेतली. त्यानंतर माझे अंगावर डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर लावून पंच नं. 01 यांचेसह डहाणू रोड रेल्वे स्टेशनच्या दिशेन पायी चालत जीआरपी पोलीस श्री पठाण व श्री नरवाडे साहेब यांचेकडे कामाच्या अनुशंगाने बोलणी करण्यासाठी पाठविले. त्याप्रमाणे मी पचं न.1 यांचेसह डहाणू रेल्वे स्टेशन वरती पायी चालत गेलो. त्यावेळी मी माझा मोबाईल वरून लोकसेवक श्री.पठाण यांचा मोबाईल वरती फोन करून लाउडस्पीकर मोडवर ठेवला असता, तो त्यांनी उचलला नाही. त्यानंतर आंम्ही लोकसेवक श्री.पठाण व श्री.नरवाडे हे नेहमी बसत असलेल्या ठिकाणी प्लॅटफॉर्म नंबर 03 वरील एम.के. गुप्ता यांच्या स्टॉलसमोर गेलो असता, सदर ठिकाणी लोकसेवक श्री.पठाण व श्री.नरवाडे हे भेटले त्यावेळी प्रथम मी माझे कामाच्या अनुषंगाने लोकसेवक श्री.पठाण यांचेशी बोलणी केली असता, त्यांनी मला तुला आज आठवण आली का? झालं का तुझं सगळं? चालू केलं का? कधीपासून चालू करतोय? असे म्हणून माझे कामाबाबत विचारणा केली. त्यानंतर श्री.नरवाडे यांनी मला प्लॅटफॉर्म नंबर 03 वर उभ्या असलेल्या ट्रेनमध्ये नेले त्यावेळी श्री.पठाण हे सदर डब्याच्या दरवाजाजवळ उभे होते. त्यानंतर श्री.नरवाडे यांनी 'जपून चालायच, तु पैसे देतो म्हणजे, कोण कस असत, जास्त ओळख होवू दयायची नाही'. तु काय करतोस कोणाला कळल नाही पाहीजे. असे बोलून मला पैसे आणले? असे विचारले असता मी आता पैसे आणतो अर्ध्या एक तासात असे सांगितले. त्यावेळी पठाण हे देखील माझे जवळ आले. त्यावेळी मी एका तासात असे सांगून किती बोला, तर असे बोललो

**असता श्री पठाण हे मला** 'सांगितले ना दहा हजार रूपये' असे बोलून त्यांनी माझेकडे रू. 10,000/- रक्कमेची **लाचेची मागणी** केली. त्यानंतर मी व पंच नं. 01 असे पडताळणी पथक थांबलेल्या ठिकाणी परत आल्यानंतर **माझेकडील** व्हॉईस रेकॉर्डर बंद केला. व त्यानंतर मी दोन्ही पंचांसमक्ष घडलेली हकीगत पोलीस उप अधीक्षक श्री. जगताप यांना सांगीतली. त्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्री.जगताप यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर मध्ये ध्वनिमुद्रीत झालेली हकीगत ऐकली असता, त्यामध्ये श्री.पठाण व श्री नरवाडे यांनी माझेकडे कामाच्या अनुषंगाने 10,000/- रू लाचेची मागणी करून ती स्विकारण्याचे मान्य केल्याचे निषन्न झाले.
त्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्री.जगताप यांनी मला तसेच दोन्ही पंचांना सापळा कारवाई बाबत थोडक्यात माहीती सांगून त्यापुर्वी सापळापुर्व कारवाई करण्यात येणार असल्याचे सांगून त्याबाबत थोडक्यात माहीती दिली. त्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्री.जगताप यांच्या सुचनेप्रमाणे मी 10,000/- रोख रक्कम त्यांचेकडे हजर केली. सदरच्या रक्कमेवर सापळा पुर्व पंचनाम्याची कारवाई पुर्ण झाल्यानंतर लाचेची रक्कम माझे नेसून शर्टाच्या डाव्या खिशामध्ये ठेवली. त्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्री.जगताप यांनी सर्वांना योग्य त्या सुचना दिल्या. व माझे अंगावर व्हॉईस रेकॉर्डर लावून लाचेच्या रक्कमेसह मला व पंच नं. 01 यांना श्री.पठाण व श्री.नरवाडे यांची भेट घेण्यासाठी डहाणू रेल्वे स्टेशनवर पायी चालत पाठविले. त्यांनतर मी श्री पठाण यांना माझे मोबाईलवरून फोन करून कुठे येवू असे विचारले असता श्री पठाण यानी मला प्लॅटफार्म न.3 वरील कॅन्टीन जवळ येण्यास सांगितले. त्यावेळी सर्व सापळा पथक आमचे पाठोपाठ चालत येवून डहाणू रेल्वे स्टेशनवरती आजुबाजुला थांबून राहीले.
त्यानंतर मी श्री पठाण यांची भेट घेतली त्यावेळी नरवाडे हे कॅन्टीनचे बाजुला स्टुलवरती बसले होते. श्री पठाण यानी 'इथुन वर नाही जाणार ना, बाहेर जरा सांभाळून करत जा, किती आहेत?' असे म्हणून लाचेची मागणी केली. त्यावेळी मी त्यांना दहा हजार आहेत असे सांगून मी माझे शर्टाच्या डाव्या खिशातून लाचेची रक्कम काढून त्याच्यासमोर धरली असता त्यांनी ती उजव्या हाताने स्विकारून दोन्ही हाताने मोजुन घेतली व पॅन्टच्या उजव्या खिशामध्ये ठेवून दिली. हा सर्व प्रकार सापळा पथकातील अधिकारी व अंमलदार यांना पाहता येत असल्याने त्यांनी लोकसेवक पठाण व नरवाडे यांना ताब्यात घेत असताना, दोघांनीही पळून जाण्याचा प्रयत्न केला त्यावेळी सापळा पथकाने प्रयत्न करून 16.59 वा. च्या सुमारास श्री. पठाण व श्री नरवाडे यांना ताब्यात घेतले असून सदरबाबत सविस्तर पंचनामा करण्यात आलेला आहे.
तरी माझे कामाच्या अनुषंगाने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पालघर कार्यालयाकडून दिनांक 28/11/2022 रोजी करण्यात आलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान महाराशष्ट्र षासनाने प्रतिबंधीत केलेला अवैध गुटखा पकडल्याने कारवाई न करण्यासाठी तसेच रेल्वेमार्गाने गुटखा वाहतुक करण्याचा धंदा चालू ठेवण्यासाठी परवाणगी देण्याकरीता दरमहा हफ्ता म्हणून श्री पठाण व श्री नरवाडे यांनी माझेकडे 10,000/- रू लाचेची मागणी करून सदरची रक्कम दिनांक 28/11/2022 रोजी 16.59 वाजताचे सुमारास डहाणू रेल्वे स्टेशनवरील प्लॅटफॉर्म नं. 03 वरील एम.के. गुप्ता यांच्या स्टॉलसमोर माझेकडून स्विकारली म्हणून माझी त्यांचेविरूध्द कायदेशिर फिर्याद आहे.
सदरची फिर्याद मी सांगितल्याप्रमाणे संगणकावर टंकलीखीत केली असून त्याची प्रिंट काढल्यानंतर मी वाचून पाहीली ती माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (**केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.**)**

(1) **Registered the case and took up the investigation:**
**(**प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले**):**

**or (**किंवा**)**

(2) **Directed (Name of I.O.) (**तपास अधिका-याचे नाव**):**
RAGHUNATH MILAYA BHASARA
**Rank (**पद**):** HC (Head Constable) **No.(**क्र.**):** 241
**to take up the Investigation (**ला तपास करण्याचे अधिकार दिले**) or (**किंवा**)**

(3) **Refused investigation due to (**ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला**):**

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

ठाणे अंमलदार
बाजारपेठ पोलीस ठाणे

**Name** (नाव): NARESH RAMESH R/
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): PCMH86962

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**: Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | 02/01/1990 | | | | चेचक के दाग: NO |
| 2 | पुरुष | 04/01/1984 | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्य ा खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)